REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 10 | JULY - 2026

# माध्यमिक स्तरावरील ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास

श्री. विलास बबनराव गरुड

## प्रस्तावना -:



ब्रिटिश राज्यवटीत इंग्रजांनी शिक्षणास फारसे महत्त्व दिले नाही . राज्यकारभार चालविण्यासाठी आवश्यक तेवढे लोक साक्षर करून राज्यव्यवस्था चालविलीभारतातील अनेक समाजसुधारकांनी मात्र . शिक्षणाचे महत्त्व ओळखून शिक्षण प्रसार करण्यासाठी अनेक प्रयत्न केलेले यामध्ये महात्मा जोतिराव फुले .दिसून येतात, सावित्रीबाई फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, आगरकर इमहाराष्ट्रातील . असे असले तरी समाजातील .शिक्षण तपस्वींचा उल्लेख करता येईल .उपेक्षित घटकांना शिक्षणाचे महत्त्व पटण्यास खूप कालावधी लागला

## संशोधन समस्येची गरज :-

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या अडचणी म्हणजे घरगुती परिस्थिती, आर्थिक परिस्थिती, शिक्षणाबाबत उदासीनता, सातत्यपूर्णपणा नसणे, पालकांमध्ये शिक्षणाबाबत जागरूकता कमी असणे यामुळे मुलांच्या मनात शिक्षणाविषयी महत्त्व वाढविण्यासाठी संशोधनाची गरज आहे.

## संशोधनाचे महत्त्व :-

1. सदर संशोधनामुळे विद्यार्थ्यांना कोणकोणत्या अडचणी आहेत यांचे ज्ञान शिक्षकांना व पालकांना होणार आहे.
2. संशोधनामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात पुन्हा जास्त प्रमाणात सक्रिय करता येईल.
3. सदर संशोधन माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अडचणींचा अभ्यास करून त्यांना पुन्हा शिक्षणाचे महत्त्व पटवून देता येईल.
4. यामुळे व्यावसायिक शिक्षण या विषयालासुद्धा या संशोधनाचा उपयोग होईल.
5. या संशोधनामुळे एकूण परिस्थितीतील अडचणींचा विचार करून नवीन अभ्यास पद्धती विकसित करण्यास चालना मिळेल.

## संशोधनाचे शीर्षक :-

"माध्यमिक स्तरावरील ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास"

## संशोधनाची उद्दिष्टे :-

1. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांबाबत शिक्षकांची मते जाणून घेणे.
2. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांबाबत विद्यार्थ्यांची मते जाणून घेणे.
3. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या अडचणींचा सखोल अभ्यास करणे.
4. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना करणे.

## संशोधनाची साधने व तंत्रे निवड :-

1. शिक्षकांसाठी प्रश्नावली
2. विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली

## नमुना निवड :-

1. ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांतील **शाळांची** निवड करण्यात आली आहे.
2. शिक्षकांची निवड : शाळांमधील प्रत्येक शाळेतून **२ शिक्षकांची** निवड करण्यात आली आहे.
3. विद्यार्थ्यांची निवड : प्रत्येक शाळेतील **१० विद्यार्थ्यांची**, अशा एकूण **५० विद्यार्थ्यांची** निवड नमुन्यासाठी करण्यात आली आहे.

## शिक्षक व विद्यार्थी प्रश्नावलीवरून संशोधनाचे निष्कर्ष :-

1. मजुरांच्या वस्तीवर शैक्षणिक कामानिमित्त भेट देणाऱ्या शिक्षकांची संख्या **08 टक्के** आहे, तर वीटभट्टी मजुरांच्या वस्तीवर शैक्षणिक कामानिमित्त भेट न देणाऱ्या शिक्षकांची संख्या **92 टक्के** आहे.
2. मजुरांच्या वस्तीवर शैक्षणिक कामानिमित्त भेट देऊन मजुरांना व्यवसायासंबंधी त्यांच्याबरोबर हितगुज न करणाऱ्या शिक्षकांची संख्या **92 टक्के** आहे.
3. **92 टक्के** शिक्षकांना शैक्षणिक सुविधा दिसून आल्या नाहीत.
4. पालक यांच्याबरोबर चर्चा करणाऱ्या शिक्षकांची संख्या **8 टक्के** आहे, तर चर्चा न करणाऱ्या शिक्षकांची संख्या **92 टक्के** आहे.
5. शाळा व्यवस्थापन समितीच्या मासिक सभेत मुला-मुलींच्या समस्येबाबत चर्चा होत नाही असे म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या **52 टक्के** आहे.
6. एखादे उपयुक्त पुस्तक ग्रंथालयामध्ये नसेल तर पुस्तकाच्या पूर्ततेची मागणी मुख्याध्यापकांकडे **64 टक्के** शिक्षक करतात. तर स्वतः पुस्तक विकत घेऊन ग्रंथालयात ठेवणारा **एक शिक्षक** आहे तसेच स्वतःची प्रत खरेदी करणारे **32 टक्के** शिक्षक आहेत.

7. मुला-मुलींच्या शैक्षणिक समस्यांपैकी **अध्ययन साहित्य नाही** असे म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या **11 (44 टक्के)** आहे. **अध्ययनात लक्ष लागत नाही** असे म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या **02 (8 टक्के)** आहे. तर विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी पुरेसा वेळ नसतो असे म्हणणाऱ्या शिक्षकांची संख्या **12 (48 टक्के)** आहे.
8. त्यांना अध्यापन केलेले समजत नाही याचे कारण ते शाळेत अधूनमधून गैरहजर राहतात असे सांगणाऱ्या शिक्षकांची संख्या **23** आहे. तर विद्यार्थ्यांत शिक्षणाची आवड नसते असे सांगणाऱ्या शिक्षकांची संख्या **02** आहे.
9. विद्यार्थी शाळेत उशिरा येण्याचे कारण सांगताना, पालकांच्या व्यवसायात मदत करावी लागते असे कारण सांगणाऱ्या शिक्षकांची संख्या **21** आहे.
10. विद्यार्थी शाळेमध्ये सतत गैरहजर राहतात असे सांगणाऱ्या शिक्षकांची संख्या **17** आहे. त्याचे प्रमाण **68 टक्के** आहे.
11. विद्यार्थी सतत गैरहजर राहिल्याने शैक्षणिक दृष्ट्या मागास राहतात असे सांगणाऱ्या शिक्षकांची संख्या **25** आहे. त्याचे प्रमाण **100 टक्के** आहे.
12. मुलांच्या गैरहजेरीचे कारण आई-वडिलांच्या व्यवसायात मदत करावी लागते असे सांगणाऱ्या शिक्षकांची संख्या **20** असून त्याचे प्रमाण **80 टक्के** आहे.
13. मुलींच्या शैक्षणिक समस्यांपैकी घरातील लहान भावंडांना सांभाळणे ही समस्या सांगणाऱ्या शिक्षकांची संख्या **04 (16 टक्के)** आहे. तसेच घरकामात मदत करावी लागते असे सांगणाऱ्या शिक्षकांची संख्या **13 (52 टक्के)** आहे.
14. मुला-मुलींच्या समस्या सोडविण्यासाठी माता, पिता व पालक यांची मदत होते असे मानणाऱ्या शिक्षकांची संख्या **18** असून त्याचे प्रमाण **72 टक्के** आहे.
15. दररोज शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या **45 (90 टक्के)** असून, कधी-कधी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या **05 (10 टक्के)** आहे.
16. शाळेत ग्रंथालय सुसज्ज नाही असे म्हणणारे **18 विद्यार्थी (38 टक्के)** आहेत.
17. अभ्यासासाठी पुस्तके शिक्षकांकडून घेणारे विद्यार्थी **17** असून त्यांचे प्रमाण **52 टक्के** आहे.
18. प्रयोग साहित्याची नावे माहिती नसतात असे सांगणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या **28 (56 टक्के)** आहे, तर प्रयोग साहित्य व्यवस्थित हाताळता येत नाही असे सांगणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या **22 (44 टक्के)** आहे.
19. शाळेमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही असे सांगणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण **64 टक्के** आहे, तर शाळेमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे असे सांगणारे **18 विद्यार्थी (36 टक्के)** आहेत.
20. वडिलांचा व्यवसाय मजुरी असल्याचे सांगणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या **50** असून त्याचे प्रमाण **100 टक्के** आहे.
21. पालकांच्या व्यवसायात मदत करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या **45 (90 टक्के)** असून, मदत न करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या **05 (10 टक्के)** आहे.
22. पालकांना त्यांच्या व्यवसायात सुट्टीच्या दिवशी मदत करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या **13** असून त्याचे प्रमाण **26 टक्के** आहे.
23. पालकांना कामात मदत करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या **40** असून त्यांचे प्रमाण **80 टक्के** आहे.
24. अभ्यास समजत नसल्यामुळे टिपणे काढता न येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या **17** आहे.
25. इंग्रजीमध्ये वाक्यरचना करता येत नाही असे सांगणारे **11 विद्यार्थी (22 टक्के)** आहेत. तसेच इंग्रजीमध्ये पत्र व नोकरीचा अर्ज लिहिता येत नाही असे सांगणारे **16 विद्यार्थी (32 टक्के)** आहेत.

## शिफारशी :-

1. सर्वच शाळेत ग्रंथालय असणे आवश्यक आहे. शाळांनी विद्यार्थ्यांना शासनाने पुरविलेली पुस्तके अभ्यासासाठी द्यावीत, कारण ग्रामीण भागातील विद्यार्थी हे आर्थिकदृष्ट्या मागास असतात.
2. जास्तीत जास्त प्रयोग हे प्रयोगशाळेत व्हावेत व प्रयोगशाळेतील संबंधित साहित्य कसे हाताळावे याची माहिती त्यांना द्यावी.
3. पालकांची सभा घेऊन त्यांना शिक्षणाविषयी महत्त्व पटवून द्यावे, जेणेकरून त्यांचा पाल्य शाळेत वेळेवर उपस्थित राहील.
4. मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी महिला मेळावे, शिबिरे आयोजित करून शासकीय व निमशासकीय सेवेतिल स्त्री कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेऊन स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून द्यावे.
5. शिक्षकांनी पालकांच्या वैयक्तिक भेटी घेऊन पाल्यांना कराव्या लागणाऱ्या कामाच्या वेळेचे नियोजन करावे.
6. इंग्रजी विषयाचे अध्यापन करताना शिक्षकांनी शक्यतो इंग्रजी भाषेतूनच शिकवावे. त्यामुळे विद्यार्थ्यांवर मातृभाषेच्या परिणामाचा प्रभाव कमी होईल व इंग्रजी अध्ययनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांनी जादा तासांचे आयोजन करावे.
7. मराठी व हिंदी या विषयांचा आशय समजण्यासाठी संबंधित शिक्षकांनी वेगवेगळ्या अध्ययन-अध्यापन पद्धतींचा वापर करून अध्ययनाची रुची वाढवावी.
8. मुलांना शाळेबद्दल उत्सुकता राहावी यासाठी शाळेत अभ्यासेतर उपक्रमही राबवावेत.
9. मुलांना अध्ययन साहित्य उपलब्ध करून द्यावे व त्यांना अध्ययनासाठी पुरेसा वेळ द्यावा.
10. त्यांच्यात शिक्षणाची आवड असणे गरजेचे असते. ती वाढविण्यासाठी शिक्षकांनी व पालकांनी प्रयत्न केले पाहिजेत.
11. विद्यार्थ्यांना व पालकांना समुपदेशन करावे.
12. काही मुलांना शिक्षणाबद्दल भीती निर्माण झालेली असते. ती शिक्षकांनी दूर करून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे गरजेचे आहे.
13. विद्यार्थी सहभाग वाढविण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांचे सलोख्याचे संबंध असणे व शिक्षकांनी स्नेहाचे वातावरण तयार करणे आवश्यक आहे.
14. सर्वच शिक्षकांनी प्रभावी अध्यापन करून विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील समस्या दूर करणे गरजेचे आहे.
15. भूगोलातील प्रश्न सोडविताना विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणी येतात. त्या कमी करण्यासाठी शिक्षकांनी सतत प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे.
16. विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर होण्यासाठी लेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा इत्यादी अनेक उपक्रम राबविणे गरजेचे आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची


1. **आगलावे, प्रदीप** (2000), *संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे*, नागपूर : विद्या प्रकाशन, एकूण पृष्ठे 504.
2. **जीवन शिक्षण** (ऑगस्ट 2008), पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.
3. **देशपांडे, वं. सी. व पाटील, वा. रे.** (2006), *प्राथमिक शिक्षणाची सद्यस्थिती : समस्या व उपाय*, प्रथमावृत्ती, पुणे : निराली प्रकाशन.
4. **प्राथमिक शाळा शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रम**, पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.
5. **बापट, भा. गो.** (1995), *शैक्षणिक संशोधन*, सुधारित आवृत्ती, पुणे : नूतन प्रकाशन.

6. **भांडारकर, पु. ल.** (1976), *सामाजिक संशोधन पद्धती*, नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, तिसरी आवृत्ती, पृष्ठे 534.
7. **भिताडे, वि. रा.** (1999), *शैक्षणिक संशोधन पद्धती*, सुधारित आवृत्ती, पुणे : नूतन प्रकाशन.